**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ८२/२०२०** | **दिनांक १३/१०/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/१०/२०२० ते १३/१०/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/१०/२०२० सकाळी ८:३० पासून १८/१०/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/१० | ०८/१० | ०९/१० | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | | १४/१० | १५/१० | १६/१० | १७/१० | १८/१० |
| ०.० | ०.० | ६.४ | ०.० | ५.४ | १.० | ९.६ | पाऊस (मिमी) | ४१ | ७७ | ३० | ४० | १५ |
| ३१.५ | ३१.३ | ३२.५ | ३१.० | ३१.६ | २९.५ | २९.६ | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३२ |
| २२.५ | २३.४ | २३.० | २५.० | २२.८ | २२.७ | २२.० | किमान तापमान (अं.से) | २५ | २४ | २६ | २६ | २५ |
| २ | ४ | ४ | ६ | ६ | ८ | ७ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ९३ | ९८ | ९५ | ९५ | ९५ | ९१ | ९५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९४ | ९५ | ९६ | ९५ | ९५ |
| ७९ | ८० | ८० | ८८ | ८७ | ८६ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७६ | ९० | ८९ | ८२ | ८५ |
| ३.२ | ३.९ | ३.६ | २.३ | ०.३ | २.२ | २.२ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | १२ | ७ | ९ | ९ |
| शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | शांत | वाऱ्याची दिशा | नै. | प. | द. | द. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २२.४ | ४०१५.५ | ५१३०.९ |

**हवामान सारांश**

| | |
|---|---|
| **हवामान अंदाज** | **प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार रत्नागिरी जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणी दिनांक १४ ते १८ ऑक्टोबर, २०२० दरम्यान मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता आहे** |
| **इशारा** | **दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार ते अतिजोरदार आणि दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी तुरळक ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पाऊसाचा इशारा देण्यात आला आहे** |
| **पाऊसाचा विस्तारित श्रेणी अंदाज** | **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक १८ ते २४ ऑक्टोबर, २०२० दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.** |

| पिक | अवस्था | हवामान अंदाजावर आधारित कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **दाणे भरणे (गरव्या जाती), पक्वता (निमगरव्या आणि हळव्या जाती)** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने तयार भात पिकाची कापणी पाउसाची उघडीप असताना करावी आणि कापणी केलेले भात शेतात न ठेवता लगेचच सुरक्षित ठिकाणी नेऊन लगेच मळणी करावी आणि उत्पादीत पिक कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे.<br>• गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. नियंत्रित करावी तसेच निम गरवे भात खाचरातील पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नागली (नाचणी)** | **पक्वता** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने पाउसाची उघडीप असताना तयार नागली पिकाची कणसे विळ्याने कापून कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी वाळविण्यासाठी पसरून ठेवावे आणि वाळल्या नंतर मळणी करावी. |
| **आंबा** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने आंबा बागेतील जुन्या अनुत्पादित झाडांची तसेच घन लागवड केलेल्या बागांची छाटणीची कामे पुढे ढकलावी. तसेच आंबाच्या नवीन पालवीचे किड व रोगापासून संरक्षणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **काजू** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने काजूच्या नवीन पालवीचे किड व रोगापासून संरक्षणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी. |
| **नारळ** | **फळधारणा** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नारळावरील इरीओफाईड कोळीच्या आणि रुगोज चक्राकार पांढरी माशीच्या नियंत्रणासाठी करण्यात येणारी फवारणी पुढे ढकलावी.<br>• हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नारळ बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **सुपारी** | **फळधारणा** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **कलिंगड** | **पेरणी** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने कलिंगड पिकाच्या पेरणीची कामे पुढे ढकलावी. |
| **भेंडी** | **पेरणी** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने भेंडी पिकाच्या पेरणीची कामे पुढे ढकलावी. |
| **भाजीपाला रोपवाटिका व** | **वाढीची अवस्था** | • हवामान अंदाजानुसार मध्यम पाऊसाची शक्यता वर्तवली असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागा तसेच भाजीपाला रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |

| | | |
|---|---|---|
| **नवीन फळबाग लागवड** | | • वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवण्याची शक्यता असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागेतील रोपांना काठीचा आधार देण्यात यावा. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या** | - | • विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता असल्याने गाई, म्हशीं, शेळ्या व इतर जनावरांचे योग्य ते संरक्षण करावे. |
| **कुकुटपालन** | - | • विजेचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊसाची शक्यता असल्याने पक्ष्यांचे योग्य ते संरक्षण करावे.<br>• ब्रॉयलर पक्षांना तीन आठवड्यापर्यंत त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे चार ते सहा आठवड्यापर्यंत ब्रॉयलर फिनिशर खाद्य द्यावे.<br>• ४ ते ५ दिवसांच्या पिल्लांना राणीखेत रोगावर पशुवैद्यकीय अधिकारी सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. पक्ष्यांच्या आणि शेडच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष द्यावे. |
| **टिप: पाऊसाची उघडीप असताना खते द्यावीत तसेच कीटकनाशकाच्या व बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात. पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |